गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक २४ वा ● सोमवार १० जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 24 | Date : 10/06/2024 blow Monday Page 4 Price 4




# देशात पुन्हा ‘मोदी सरकार’

## महाराष्ट्रातील सहा मान्यवरांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांची उपस्थिती

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची आज तिसऱ्यांदा शपथ घेतली. राष्ट्रपती भवनातील भव्य सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान पदाची शपथ दिली. या शपथविधी सोहळ्यात विविध मान्यवरांची उपस्थिती होती. या शपथविधी सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. यासोबत महाराष्ट्रातील मंत्री चंद्रकांत पाटील, मंगलप्रभात लोढा, दीपक केसरकर, सुरेश खाडे, छगन भुजबळ, गिरीश महाजन आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर कार्यक्रमात सहभागी झाले होते. या सर्व नेत्यांनी मोदींच्या शपथविधीचे कौतुक केले आणि देशाच्या पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

या शपथविधी कार्यक्रमात महाराष्ट्रातील नितीन गडकरी, पियुष गोयल, रामदास आठवले, प्रतापराव जाधव , रक्षा खडसे, आणि मुरलीधर मोहोळ केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेतली. राष्ट्रपती भवनातील या शपथविधी सोहळ्यात उपराष्ट्रपती जयदीप धनखड, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश चंद्रचूड यांच्यासह देशातील विविध राज्यांचे प्रमुख, राजकीय नेते, उद्योगजगताचे मान्यवर आणि अनेक परराष्ट्र प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शवली. श्री मोदी यांनी आपल्या भाषणात सर्वांनी एकत्र येऊन देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले. या ऐतिहासिक सोहळ्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळाची सुरुवात झाली असून पुढील वर्षांमध्ये देशाच्या विकासासाठी विविध योजना आणि उपक्रम राबविले जातील.आज एकूण ७२ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली, यामध्ये ३० केंद्रीय मंत्री, ५ राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि ३६ राज्यमंत्री यांचा समावेश आहे.



## मोदींच्या मंत्रिमंडळातील सदस्यांची नावे वाचा संपूर्ण यादी



**राजधानीत राष्ट्रपती भवन परिसरात झालेल्या भव्य कार्यक्रमात नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. मोदींसोबत मंत्रिमंडळातील अन्य सहकाऱ्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नरेंद्र मोदींनी पद आणि गोपिनियतेची शपथ दिली. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे मोदी हे पहिलेच नेते आहेत. या कार्यक्रमासाठी देश आणि विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित होते.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह ३० कॅबिनेट आणि ४२ राज्य मंत्री अशा एकूण ७२ जणांना शपथ दिली. यात भाजपच्या ६१ जणांचा समावेश आहे. या मोदींच्या मंत्रिमंडळात महाराष्ट्रातून २ कॅबिनेट आणि ४ राज्य मंत्र्यांचा समावेश आहे. मोदींनी मंत्रिमंडळात ६ महिलांना स्थान दिले आहे.**

**या क्रमाने झाला शपथविधी**

१) नरेंद्र मोदी, पंतप्रधान
२) राजनाथ सिंह, कॅबिनेट मंत्री (भाजप)
३) अमित शहा, कॅबिनेट मंत्री (भाजप)
४) नितीन गडकरी, कॅबिनेट मंत्री (भाजप,महाराष्ट्र)
५) जे.पी. नड्डा, कॅबिनेट मंत्री (भाजप)
६) शिवराज सिंह चौहान, कॅबिनेट मंत्री (भाजप)
७) निर्मला सितारमन, कॅबिनेट मंत्री (भाजप)
८) एस.जयशंकर, कॅबिनेट मंत्री (भाजप)
९) मनोहरलाल खट्टर, कॅबिनेट मंत्री (भाजप)
१०) एच.डी कुमारस्वामी,कॅबिनेट मंत्री (जनता दल)
११) पियुष गोयल, कॅबिनेट मंत्री (भाजप, महाराष्ट्र)
१२) धर्मेंद्र प्रधान, कॅबिनेट मंत्री (भाजप)
१३) जीतनराम मांझी,कॅबिनेट मंत्री (हिंदुस्थानी मोर्चा)
१४) राजीवरंजनसिंह,कॅबिनेट मंत्री (जनता दल संयुक्त)
१५) सर्बानंद सोनोवाल, कॅबिनेट मंत्री (भाजप)
१६) वीरेंद्र कुमार, कॅबिनेट मंत्री (भाजप)
१७) राम मोहन नायडू, कॅबिनेट मंत्री (टीडीपी)
१८) प्रल्हाद जोशी, कॅबिनेट मंत्री (भाजप)
१९) जुएल ओराम, कॅबिनेट मंत्री (भाजप)
२०) गिरीराज सिंह, कॅबिनेट मंत्री (भाजप)
२१) अश्रि्वनी वैष्णव, कॅबिनेट मंत्री (भाजप)
२२) ज्योतिरादित्य शिंदे, कॅबिनेट मंत्री (भाजप)
२३) भूपेंद्र यादव, कॅबिनेट मंत्री (भाजप)
२४) गजेंद्रसिंह शेखावत,कॅबिनेट मंत्री
२५) अन्नपूर्णा देवी,कॅबिनेट मंत्री (भाजप)
२६) किरण रिजुजू,कॅबिनेट मंत्री (भाजप)
२७) हरदीपसिंग पुरी,कॅबिनेट मंत्री (भाजप)
२८) मनसुख मांडविय,कॅबिनेट मंत्री (भाजप)
२९) जी. किशन रेड्डी,कॅबिनेट मंत्री (भाजप)
३०) चिराग पासवान, मंत्री (लोक जनशक्ती पार्टी)
३१) सी.आर. पाटील,राज्य मंत्री (भाजप)
३२) राव इंद्रजित सिंह, राज्य मंत्री (भाजप)
३३) डॉ. जितेंद्र सिंह, राज्य मंत्री (भाजप)
३४) अर्जुन राम मेघवाल, राज्य मंत्री (भाजप)
३५)प्रतापराव जाधव,राज्य मंत्री (शिवसेना,महाराष्ट्र)

**प्रतापराव गणपतराव जाधवचा भारतीय संविधानाच्या प्रतिज्ञेतून शपथ**

३६) जयंत चौधरी, राज्य मंत्री (राष्ट्रीय लोकदल)
३७) जितीन प्रसाद, राज्य मंत्री (भाजप)
३८) श्रीपाद नाईक, राज्य मंत्री (भाजप)
३९) पंकज चौधरी, राज्य मंत्री (भाजप)
४०) कृष्णपाल, राज्य मंत्री (भाजप)
४१) रामदास आठवले, । **पान २ वर**

## मागील मोदी सरकारमधील २० मंत्र्यांना वगळले

**पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक करणारे दुसरे पंतप्रधान नरेंद्र मोदी ठरले. आज त्यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. यामध्ये नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. मोदी २.० मधील नारायण राणे, स्मृती इराणींसह २० दिग्गज मंत्र्यांना वगळण्यात आले आहे. तर काहींचा पराभव झाल्यामुळे त्यांना**
**मंत्रिमंडळात स्थान नाही..**

**वगळलेले मंत्री**

- **स्मृती इराणी**
- **नारायण राणे**
- **मीनाक्षी लेखी**
- **अनुराग ठाकूर**
- **रावसाहेब दानवे**
- **जनरल वी.के सिंह**
- **अर्जुन मुंडा**
- **साध्वी निरंजन ज्योती**
- **आर.के. सिंह**
- **राजीव चंद्रशेखर**
- **कपिल पाटील**
- **अजय मिश्रा टेनी**
- **सुभाष सरकार**
- **जॉन बारला**
- **भारती पवार**
- **अश्विनी चौबे**
- **निशीथ प्रमाणिक**
- **अजय भट्ट**
- **राजकुमार रंजन सिंह**
- **भागवत कराड**

## मोदींच्या नव्या मंत्रिमंडळाची आज पहिली बैठक, कोणत्या विषयावर होणार चर्चा?

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा रविवारी सायंकाळी पार पडला. पंतप्रधानांसह ३० कॅबिनेट, पाच स्वतंत्र कारभार असलेले राज्यमंत्री व ३६ राज्यमंत्र्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. राज्यातील सहा जणांना पहिल्या मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले असून यात तीन नवे चेहरे आहेत. या शपथविधीने वाजपेयी सरकारनंतर पुन्हा एकदा रालोआचा कालखंड सुरू झाला आहे. दरम्यान, आज सायंकाळी पाच वाजता एनडीए सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक होणार आहे. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

मोदींच्या निवासस्थानी संध्याकाळी ५ वाजता नव्याने समाविष्ट झालेल्या मंत्र्यांची बैठक होणार आहे. भाजपाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनीही मोदी सरकारच्या नवीन मंत्रिमंडळात समाविष्ट झालेल्यांसाठी डिनरचे आयोजन केले होते, असे सूत्रांनी सांगितले. कुमारस्वामी, शिवराजसिंह चौहान, खट्टर, सर्बानंद सोनोवाल, मांझी आणि राजनाथ सिंह या सहा माजी मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारमध्ये नवी भूमिका स्वीकाली आहे. तर मागच्या मंत्रिमंडळातील नारायण राणे, स्मृती इराणी, अनुराग ठाकूर आणि राजीव चंद्रशेखर या महत्त्वाच्या मंत्र्यांना वगळण्यात आले आहे. नव्या मंत्रिमंडळात २७ ओबीसी, १० दलित, ५ आदिवासी, ५ अल्पसंख्याक नेत्यांचा समावेश आहे. अश्रि्वनी वैष्णव, हरदीपसिंह पुरी, जयशंकर, कुरियन, सीतारामन हे राज्यसभेतील खासदार मंत्री असून पंजाबमधील रवनीतसिंह बिट्टू आणि तमिळनाडूतील एम. मुरुगन यांना लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतरही केंद्र सरकारमध्ये स्थान देण्यात आले आहे. या नव्या मंत्रिमंडळाची आज पहिली बैठक होणार असून पहिल्याच बैठकीत कोणत्या विषयावर चर्चा, कोणते निर्णय घेतले जातात हे पाहावं लागणार आहे.

## देवेंद्र फडणवीसांकडून लोकसभेतील निकालाचं विश्लेषण!

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील महायुतीला महाराष्ट्रात पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवाचे विश्र्लेषण करण्यासाठी आज भाजपाकडून पदाधिकारी आणि आमदारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या राज्यातील पराभवाची कारणं सांगितली. तसेच त्यांनी यावेळी राजीनाम्याच्या मुद्द्यावरही भाष्य केलं.

या निवडणुकीत आपण फक्त तीन पक्षांशी नाही, तर ४ पक्षांशी लढत होतो. तो ४ चौथा पक्ष म्हणजे खोटा प्रचार होता. हा खोटा प्रचार आपल्या लक्षात आला नाही. त्यामुळे आपण त्याला रोखू शकलो नाही किंबहूना आपण त्याला रोखण्यासाठी तयारी करू शकलो नाही, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



या निवडणुकीत भाजपा संविधान बदलणार असा खोटा प्रचार करण्यात आला. त्याचा परिणाम जेव्हा आपल्याला लक्षात आला, तेव्हा राज्यात ४ टप्प्याचे मतदान झाले होते. आपण या खोट्या प्रचाराला योग्य प्रकारे उत्तर देऊ शकलो नाही. त्याचा परिणाम म्हणजे, पहिल्या तीन टप्प्यात भाजपाला २४ पैकी केवळ ४ जागा मिळाल्या, तर उर्वरित जागा आपल्याला पुढच्या दोन टप्प्यात मिळाल्या, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

निवडणूक प्रचारादरम्यान इतर राज्यांनी महाराष्ट्रातील उद्योग पळवले, असा खोटा प्रचार करण्यात आला. मात्र, प्रत्यक्ष आकडेवारी बघितली, तर तर २०२२-२३, २३-२४ या दोन्ही वर्षात महाराष्ट्र गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर राहिला. उद्धव ठाकरे यांच्या काळात गुजरात, कर्नाटक महाराष्ट्रापेक्षा पुढे होते. परंतु भाजपाच्या काळात गुजरात-कर्नाटक यांच्या पेक्षा जास्त गुंतवणूक ही महाराष्ट्रात आली. महाविकास आघाडीचे नेते रोज खोटं बोलायचे, उद्योग पळवले असं सांगायचे, जर उद्योग पळाले असतील तर । **पान २ वर**

## दहशतवादी हल्ल्यात नऊ जण ठार; गोळीबारानंतर वैष्णोदेवी यात्रेकरूंची बस दरीत कोसळून अपघात



जम्मू : जम्मू आणि काश्मीरमधील रियासी जिल्ह्यात दहशतवाद्यांनी रविवारी वैष्णोदेवी यात्रेकरूंच्या बसवर गोळीबार केला. या हल्ल्यामुळे बस दरीत कोसळून नऊ जण ठार झाल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. शिव खोरी मंदिर येथून हे यात्रेकरू कटऱ्याला जात होते. या घटनेत ३३ जण जखमी झाले.एकीकडे नरेंद्र मोदी यांच्या सलग तिसऱ्या शपथविधीची दिल्लीत तयारी सुरू असताना रविवारी संध्याकाळी सव्वासहाच्या सुमाराला भाविकांच्या बसवर गोळीबार झाला. रियासीचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक मोहित शर्मा यांनी सांगितले की, पौनी भागाजवळ तिर्यथ । **पान २ वर**

# संपादकीय

## त्याची नोंद घ्यावीच लागेल...

भाजपप्रणीत एनडीए आघाडीला निसटते बहुमत मिळाले असले तरी भाजपचे स्वबळाचे बहुमत गमावले गेले आहे. एनडीए आघाडीला जे काही बहुमत मिळाले आहे ते केवळ बोटावर मोजता येईल इतके तकलादू आहे. त्यातही नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू या दोन नेत्यांच्या तालावर या मोदी सरकारला पुढील काळात कसरत करावी लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्यक्तिगत करिष्म्यावर ही निवडणूक भाजपने लढवली होती. त्यांच्या आघाडीत संख्येने बरेच पक्ष असले तरी नाव घेता येईल असे केवळ तीन–चारच पक्ष त्यांच्याकडे होते. गेल्या दहा वर्षांच्या मोदींच्या राजवटीत दोन्ही वेळा मोदींच्या पक्षाकडे स्वबळावर बहुमत असल्याने त्यांनी कधीच एनडीएतील मित्र पक्षांची तमा बाळगली नव्हती किंवा त्यांना धोरणात्मक निर्णय घेताना फारशी किंमतही दिली नव्हती. पण आता मात्र मोदींना असे करून चालणार नाही. कारण चंद्राबाबू आणि नितीशकुमार या दोन दिग्गज नेत्यांना विश्वासात घेऊन किंवा त्यांना विचारूनच सरकारची पावले टाकावी लागणार आहेत. चंद्राबाबू आणि नितीशकुमार हे लोकशाही मानणारे आणि त्याची जपणूक व्हावी अशी मनस्वी इच्छा असणारे नेते आहेत. त्यामुळे यापुढील काळात आता केवळ मोदी एके मोदी असे चालणार नाही आणि अमित शहांना एकतर्फी मनमानी कारभार करता येणार नाही, असाही संदेश या निकालातून दिला गेला आहे. ही निवडणूक विरोधी पक्षांसाठी अत्यंत अवघड निवडणूक होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या गेल्या ७५ वर्षांच्या राजवटीत केंद्रातील कोणत्याही सरकारने विरोधकांची केवळ निवडणुकीच्या हेतूने इतकी गळचेपी केली नव्हती. काँग्रेससारख्या देशातल्या प्रमुख राजकीय पक्षाची सारी बँक खातीच निवडणूक काळात गोठवून त्यांना आर्थिकदृष्ट्या पूर्ण अपंग केले गेले. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या मंत्र्यांवर ईडी वगैरे यंत्रणांचा वरवंटा चालवून त्यांच्यावर दहशत बसवण्याचा प्रयत्न केला गेला. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूतील मंत्र्यांना अटक केली गेली. बाकी निवडणूक आयोगालाच बटिक बनवून आपल्याला हवा तसा निवडणूक कार्यक्रम बनवला गेला, विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या. याची कुठे दाद ना फिर्याद अशा असाहाय्य अवस्थेत विरोधकांनी विशेषत: काँग्रेस व इंडिया आघाडीच्या नेत्यांनी ही निवडणूक लढवली आहे. इंडिया आघाडी बहुमतापासून काहीशी दूर राहिली असली तरी त्यांनी अत्यंत लक्षणीय यश मिळवले आहे त्याची नोंद घ्यावीच लागेल.

# मुंबईकरांचा प्रवास सुखकर करणारा सागरी किनारा मार्ग

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मुंबई शहरातील धकाधकीच्या जीवनात वेळ आणि इंधन बचतीला आत्यंतिक महत्त्व आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या सागरी किनारा मार्ग (दक्षिण) ची एक बाजू वाहतुकीसाठी खुली होत असून वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुखकर करण्यामध्ये हा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळख असलेले मुंबई हे भारतातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक प्रमुख शहर आहे. दक्षिण मुंबईतील परिसर व्यापार उदिमाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जातो. सात बेटांनी तयार झालेल्या मुंबईचा भौगोलिक विस्तार उत्तर दक्षिण असा पसरलेला असल्याने येथील देशाच्या मुख्य भागाशी जोडलेले दोन मुख्य रस्ते देखील उत्तर दक्षिण असेच बांधलेले होते. साहजिकच या रस्त्यांवर वाहतूक कोंडी ही नित्याची बाब असे. तथापि मागील काही वर्षांत या रस्त्यांना पूरक असे नवीन रस्ते तयार होत असल्याने रहदारीची ही जटील समस्या कमी होऊ लागली आहे. नुकत्याच सुरू झालेल्या 'अटल सेतू' नंतर आता सोमवारी वाहतुकीसाठी खुला होत असलेला मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**प्रकल्पामुळे होणारे फायदे**

सागरी किनारी रस्त्यामुळे अंदाजे ७० टक्के वेळेची बचत होणार असून इंधनामध्ये ३४ टक्के बचत होईल. इंधन बचतीमुळे प्रती वर्षी विदेशी चलनाची देखील मोठ्या प्रमाणात बचत होईल. ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होईल. सुमारे ७० हेक्टर हरितक्षेत्र निर्मितीमुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होऊन मुंबईकरांचे जीवनमान सुधारेल. या हरितक्षेत्रात सायकल ट्रॅक, सार्वजनिक उद्याने, जॉगिंग ट्रॅक, खुले प्रेक्षागृह आदी प्रस्तावित आहेत. या रस्त्यामुळे इतर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि सुरक्षित व जलद प्रवास करता येईल. मुंबईकरांना सागर किनारी अतिरिक्त प्रोमीनेड उपलब्ध होईल.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) हा दक्षिण मुंबईतील प्रिन्सेस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वांद्रे वरळी सी लिंकच्या वरळी टोकापर्यंत असणार आहे. या रस्त्याची लांबी १०.५८ कि.मी. असून मार्गिकांची रस्त्यावरील संख्या दोन्ही बाजूला प्रत्येकी चार असेल. तर बोगद्यांमध्ये ती दोन्ही बाजूला प्रत्येकी तीन असेल. भराव टाकून बनविलेल्या रस्त्यांची लांबी ४.३५ कि.मी. असून पुलांची एकूण लांबी २.१९ कि.मी.आहे. या मार्गातील मलबार हिल टेकडीच्या खालील दुहेरी बोगद्यांची लांबी प्रत्येकी २.०७२ कि.मी. असून त्याचा अंतर्गत व्यास ११ मीटर आहे. याचे एकूण भरावक्षेत्र १११ हेक्टर इतके असून तीन ठिकाणी आंतरबदल असतील ज्यांची लांबी १५.६६ कि.मी. इतकी आहे. ७.५ कि.मी. लांबीचे नवीन पदपथ असून बस वाहतूकीसाठी समर्पित मार्गिका ठेवण्यात आली आहे. समुद्री लाटांपासून बचावासाठी ७.४७ कि.मी. लांबीची सागरी तटरक्षक भिंत असणार आहे. या प्रकल्पात अमरसन्स, हाजी अली, वरळी डेअरी, थडाणी जंक्शन, वरळी येथे पार्किंगची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.हा प्रकल्प मे २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाचे काम




प्रगतीपथावर असून २५ फेब्रुवारी पर्यंत याची भौतिक प्रगती ८५.९१ टक्के तर आर्थिक प्रगती ८१.१९ टक्के इतकी झाली आहे. बोगदा खणन काम १०० टक्के पूर्ण झाले असून पुन:प्रापणाचे (रिक्लेमेशन) चे काम ९८ टक्के पूर्ण झाले आहे. समुद्रभिंत उभारण्याचे काम देखील पूर्णत्वास आले असून आंतरबदल ८७ टक्के तर पुलांचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे.

**बोगद्याची वैशिष्ट्ये** किनारा मार्गावरील पहिला बोगदा खणण्याची सुरुवात जानेवारी २०२१ मध्ये करण्यात आली होती. हा बोगदा जानेवारी २०२२ मध्ये पूर्ण झाला. दुसरा बोगदा खणण्याची सुरुवात एप्रिल २०२२ मध्ये करण्यात आली आणि हा बोगदा मे २०२३ मध्ये पूर्ण झाला. बोगद्याला ३७५ मि.मी. जाडीचे काँक्रीटचे अस्तर लावण्यात आलेले असून त्यावर अग्नीप्रतिबंधक उपाययोजनेअंतर्गत अग्नीरोधक फायरबोर्ड लावण्यात येत आहेत. भारतात प्रथमच सकार्डो वायुविजन प्रणालीची व्यवस्था करण्यात आली असून आपत्कालिन निर्वासनासाठी प्रत्येक ३०० मीटरवर छेद बोगदे आहेत. उपयोगिता सेवेसाठी बोगद्यांमध्ये युटीलिटी बॉक्सची व्यवस्था करण्यात आली आहे. दुहेरी बोगद्यासाठी अद्ययावत वाहतूक व्यवस्थापन नियंत्रण प्रणालीची व्यवस्था करण्यात येत आहे.

**प्रकल्पाचा खर्च**

मुंबई किनारी रस्त्यासाठी एकूण बांधकाम खर्च १३९८३.८३ कोटी रुपये अपेक्षित आहे. यामध्ये ९३८३.७४ कोटी रुपयांच्या प्रत्यक्ष बांधकाम खर्चाबरोबरच इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश आहे.

**इतर वैशिष्ट्ये** सागरी रस्ता प्रकल्पातील बोगदा खणणाऱ्या यंत्राने (टीबीएम) खोदण्यात येणारा भारतातील सर्वात मोठ्या व्यासाचा बोगदा (व्यास १२.१९ मी.) आहे. भारतात प्रथमच रस्ते वाहतूक बोगद्यामध्ये सकार्डो वायुविजन प्रणालीची योजना करण्यात आली आहे. तसेच भारतामध्ये प्रथमच एकलस्तंभ पाईलचा पाया बांधून पुलांची उभारणी करण्यात आली आहे. एकाच प्रकल्पामध्ये पुन:प्रापण करुन रस्ता, पूल, उन्नत मार्ग, उतरण मार्ग, आच्छादित बोगदा, समुद्र तसेच टेकडीखालून बोगदा, हरितक्षेत्राची निर्मिती करण्यात आली आहे. प्रकल्पातील प्रवाळांचे (कोरल) स्थलांतर व अस्तित्व टिकविण्याचे काम यशस्वीरित्या साध्य करण्यात आले आहे. एकूणच वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करून मुंबईकरांचे दैनंदिन जीवनमान सुखकर करण्यामध्ये हा किनारा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, हे निश्चित.

पान १ वरुन

## मोदींच्या मंत्रिमंडळातील सदस्यांची

राज्य मंत्री (रिपाई, महाराष्ट्र)

आठवलेंना पुन्हा संधी, तिसऱ्यांदा मंत्रिपदाचा शपथविधी

४२) रामनाथ ठाकूर, राज्य मंत्री (डेडीयू)
४३) नित्यानंद राय, राज्य मंत्री (भाजप)
४४) अनुप्रिया पटेल, राज्य मंत्री (अपना दल)
४५) व्ही.सोमण्णा, राज्य मंत्री (भाजप)
४६) चंद्रशेखर पेम्मासानी, राज्य मंत्री (टीडीपी)
४७) एसपी सिंह बघेल, राज्य मंत्री (भाजप)
४८) शोभा करंदलाजे, राज्य मंत्री (भाजप)
४९) किर्तीवर्धन सिंह, राज्य मंत्री (भाजप)
५०) बी.एल. वर्मा, राज्य मंत्री (भाजप)
५१) शंतनू ठाकूर, राज्य मंत्री (भाजप)
५२) सुरेश गोपी, राज्य मंत्री (भाजप)
५३) एल. मुरुगन, राज्य मंत्री (भाजप)
५४) अजय टामटा, राज्य मंत्री (भाजप)
५५) बंडी संजय, राज्य मंत्री (भाजप)
५६) कमलेश पासवान, राज्य मंत्री (भाजप)
५७) भगीरथ चौधरी, राज्य मंत्री (भाजप)
५८) सतीशचंद्र दुबे, राज्य मंत्री (भाजप)
५९) संजय सेठ, राज्य मंत्री, (भाजप)
६०) रवनीत सिंग बिट्टू, राज्य मंत्री (भाजप)
६१) दुर्गादास उईके, राज्य मंत्री (भाजप)
६२) रक्षा खडसे, राज्य मंत्री (भाजप, महाराष्ट्र)

रावेरमधून तिसऱ्यांदा खासदार, रक्षा खडसेंची मंत्रिपदाची शपथ

६३) सुकांता मुजूमदार, राज्य मंत्री (भाजप)
६४) सावित्री ठाकूर, राज्य मंत्री (भाजप)
६५) तोखन साहू, राज्य मंत्री (भाजप)
६६) राजभूषण चौधरी, राज्य मंत्री (भाजप)
६७) भूपतीराजू श्रीनिवास वर्मा, राज्य मंत्री (भाजप)
६८) हर्ष मल्होत्रा, राज्य मंत्री (भाजप)
६९)निमुबेन बांभणिया, राज्य मंत्री (भाजप)
७०) मुरलीधर मोहोळ, राज्य मंत्री (भाजप, महाराष्ट्र)

नगरसेवक ते केंद्रीय मंत्री, मुरली अण्णांनी राज्य मंत्रीपदाची शपथ घेतली

७१) जॉर्ज कुरीयन, राज्य मंत्री (भाजप)
७२) पवित्र मार्गेरिटा, राज्य मंत्री (भाजप)

## देवेंद्र फडणवीसांकडून लोकसभेतील..

गुजरातच्या दुप्पट आणि गुजरात–कर्नाटकपेक्षा जास्त गुंतवणूक आपल्याकडे कशी आली असती? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला.

मराठवाड्यात मराठा आरक्षणासंदर्भात खोटा प्रचार करण्यात आला. मराठा समाजाला भाजपाने आरक्षण दिले. महामंडळे आणि मराठा समाजासाठी अनेक योजना या आपल्या काळातच झाल्या. मात्र, ज्यांनी १९८० पासून मराठा आरक्षणाला विरोध केला त्यांच्याकडे मराठा समाजाची काही मते गेली. त्यामुळे आपण मराठा विरोधी आहोत, असा खोटा प्रचार करण्यात विरोधक यशस्वी झाले, असेही ते म्हणाले.

उद्धव ठाकरेंना फार सहानुभूती असती तर मुंबई, कोकणात दिसायला हवी होती. ठाण्यापासून कोकणापर्यंत ठाकरे गटाला एकही जागा मिळाली नाही. मुंबईत ठाकरे गटाचे उमेदवार मराठी माणसांच्या मतांवर निवडून आले नाहीत. मराठी माणसांनी मत दिलं असते तर दक्षिण मुंबईत वरळीत जिथं आदित्य ठाकरे आमदार आहेत केवळ ६ हजार मते अधिक मिळाली नसती, असंही फडणवीस यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी राजीनामाच्या मुद्द्यावरही भाष्य केलं. मी ज्यावेळी राजीनामा देण्याचा विचार केला तेव्हा माझ्या डोक्यात काही रणनीती होती, आजही आहे. आपण सगळ्यांनी माझ्यावर विश्र्वास दाखवला. मी काल अमित शाह यांना भेटलो. त्यांचीही भूमिका तुमच्यापेक्षा फार वेगळी नव्हती. ते मला म्हणाले की, थोडे दिवस जाऊद्या. त्यानंतर आपण महाराष्ट्राबाबतची ब्ल्यू प्रिंट ठरवू असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं.

## दहशतवादी हल्ल्यात नऊ..

गावाजळ झालेल्या या हल्ल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून बस खोल दरीत कोसळली. बचावकार्य पूर्ण झाले असून नऊ मृतदेह हाती आले आहेत. मृतांची ओळख पटलेली नाही, मात्र प्राथमिक माहितीवरून ते सर्वजण उत्तर प्रदेशातील असल्याची शक्यता आहे. जखमींना नजिकच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. एका हल्लेखोराने चेहरा झाकून घेतला होता आणि त्याने बसवर गोळीबार केल्याचे एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले. जम्मूमधील राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांत अलिकडे दहशतवादी घटनांमध्ये वाढ झाली आहे. मात्र, रियासी जिल्हा तुलनेने शांत होता. रविवारच्या घटनेमुळे या भागातील हिंसाचारात वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# विधानपरिषद शिक्षक, पदवीधर मतदारसंघाची द्वैवार्षिक निवडणूक २६ जून रोजी

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज:** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरिता निवडणूक होत असून बुधवार, २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणूक प्रक्रियेबाबत काही सूचना असल्यास राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी दि.३० मे पर्यंत त्या लेखी स्वरुपात मुख्य निवडणूक कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांना सादर कराव्यात, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी येथे केले.

मंत्रालयात आयोजित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबतच्या बैठकीत श्री.चोक्कलिंगम यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक कार्यक्रमाची माहिती संबंधितांना दिली. यावेळी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी, सहनिवडणूक अधिकारी मनोहर पारकर यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




यावेळी श्री. एस.चोक्कलिंगम यांनी सांगितले की, विलास विनायक पोतनीस (मुंबई पदवीधर मतदारसंघ), निरंजन वसंत डावखरे (कोकण पदवीधर मतदारसंघ) किशोर भिकाजी दराडे (नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ) आणि कपिल हरिश्र्चंद्र पाटील (मुंबई शिक्षक मतदारसंघ) हे दि.७ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे आयोगाने २ शिक्षक मतदारसंघ आणि २ पदवीधर मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

या निवडणुकीसाठी शुक्रवार, ३१ मे २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात येईल. या निवडणुकीकरिता शुक्रवार, ७ जून २०२४ पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येईल. उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जांची छाननी सोमवार, १० जून २०२४ रोजी केली जाईल तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत बुधवार, १२ जून २०२४ अशी आहे. बुधवार २६ जून २०२४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत या चारही मतदारसंघाकरिता मतदान होईल. सोमवार १ जूलै २०२४ रोजी मतमोजणी होईल. ही संपूर्ण प्रक्रिया दिनांक ५ जूलै २०२४ रोजी पूर्ण होणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने दि.२४ मे २०२४ रोजी या निवडणूकीसाठीचे प्रसिद्धीपत्र जारी केले आहे. हे प्रसिद्धीपत्रक जारी केलेल्या दिनांकापासून तात्काळ संबंधित मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. मुंबई पदवीधर तसेच कोकण विभाग पदवीधर मतदारसंघासाठी विभागीय आयुक्त,कोकण विभाग, हे निवडणूक निर्णय अधिकारी असणार आहेत. नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघासाठी विभागीय आयुक्त, नाशिक तर मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी विभागीय आयुक्त,कोकण विभाग निवडणूक निर्णय अधिकारी असणार आहेत.

शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार नोंदणीची आकडेवारी

या विधान परिषदेच्या निवडणूकांकरिता अंतिम मतदार यादी दि.३० डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तथापि उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिनांकापर्यंत दि.७ जून २०२४ पर्यंत या यादीमध्ये सुधारणा करता येईल. त्यासाठी या दिनांकापूर्वी दहा दिवस आधी म्हणजे दि. २८ मे २०२४ पर्यंत प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जातील. दि.१ नोव्हेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारित शिक्षक विधानपरिषद मतदारसंघात मुंबई मतदारसंघात दि.३० डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीनुसार १४,५१५ इतकी संख्या असून निरंतर अद्यतनामुळे झालेली वाढ ही १,४०४ इतकी असून यानुसार दि.२८ मे २०२४ रोजीची एकूण मतदारसंख्या १५,९१९ इतकी आहे. यामध्ये मुंबई शहर २,७४८ मतदारसंख्या तर मुंबई उपनगरमध्ये १३,१७१ इतकी मतदारसंख्या आहे. २०१८ मध्ये मुंबई मतदारसंघात एकूण मतदार संख्या १०,१७० इतकी होती.

नाशिक मतदार संघात दि.३० डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीनुसार ६४,८०२ इतकी संख्या असून निरंतर अद्यतनामुळे झालेली वाढ ही १,७५५ इतकी असून यानुसार दि.२८ मे २०२४ पर्यंत रोजीची एकूण मतदारसंख्या ६६,५५७ इतकी आहे. यामध्ये नाशिक २४,९६५ मतदारसंख्या तर धुळे ८,१६५, नंदुरबार ५,४९५, जळगांव १३,११४, अहमदनगर १४,८१८ इतकी मतदारसंख्या आहे. २०१८ मध्ये नाशिक मतदारसंघात एकूण मतदार संख्या ५३,८९२ इतकी होती.

पदवीधर विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार नोंदणीची आकडेवारी

पदवीधर विधानपरिषद मतदारसंघाच्या मुंबई मतदारसंघात दि.३० डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदारयादीनुसार एकूण मतदारसंख्या ९१,२६३ इतकी संख्या असून निरंतर अद्यतनामुळे झालेली वाढ ही २५,६६० इतकी असून यानुसार दि.२८ मे २०२४ पर्यंत रोजीची एकूण मतदारसंख्या १,१६,९२३ इतकी आहे. यामध्ये मुंबई शहर मध्ये ३१,२२९ तर मुंबई उपनगरमध्ये ८५,६९४ इतकी मतदारसंख्या आहे. सन २०१८ ची मुंबई या मतदारसंघातील एकूण मतदार नोंदणी ही ७०,५१३ इतकी होती.

कोकण मतदारसंघात दि.३० डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदारयादीनुसार एकूण मतदारसंख्या १७,७५१० इतकी असून निरंतर अद्यतनामुळे झालेली वाढ ही ३६,४०७ इतकी असून यानुसार दि.२८ मे २०२४ पर्यत रोजीची एकूण मतदारसंख्या २,१३,९१७ इतकी आहे. यामध्ये पालघर मध्ये २५,११५ तर ठाण्या मध्ये ९५,०८३, रायगडमध्ये ५३,५४३, रत्नागिरी २२,२०५, सिंधुदुर्ग १७,९७१ इतकी मतदारसंख्या आहे. सन २०१८ ची कोकण या मतदारसंघातील एकूण मतदार नोंदणी ही १,०४,४८८ इतकी होती.

राज्यसभेवरील रिक्त झालेल्या पदासाठीच्या निवडणुकीबाबत

महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांनी राज्यसभेवर निवड केलेल्या प्रफुल्ल पटेल,राज्यसभा सदस्य यांनी त्यांच्या पदाचा कार्यकाळ संपण्यापूर्वी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी भारत निवडणूक आयोगाने दि. २७ मे २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्राद्वारे निवडणूक कार्यक्रम घोषित केला आह. दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांचे पद रिक्त झाले असून या पदाचा कालावधी दि. ४ जूलै, २०२८ पर्यंत होता.या रिक्त झालेल्या पदासाठी भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार गुरवार, दि. ६ जून २०२४ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात येईल, (नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक), नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा अतिम दिनांक दि.१३ जून, २०२४, गुरवार आहे. दि.१४ जून २०२४, शुक्रवार रोजी नामनिर्देशन पत्र छाननी करण्यात येईल तर दि.१८ जून, २०२४, मंगळवार रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत राहील.

मतदानाचा दिनांक २५ जून, २०२४ मंगळवार असून या दिवशी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदानाची वेळ असेल. दि.२५ जून मंगळवार रोजी सायं.५ वा. मतमोजणी केल्या जाईल. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शुक्रवार, दि. २८ जून २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. या निवडणूकीसाठी जितेंद्र भोळे, सचिव, (१) प्रभारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहतील. अशी माहिती यावेळी श्री.चोक्कलिंगम यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शपथविधीपूर्वी रामदास आठवलेंनी दिल्लीतील निवासस्थानी केली सहकुटुंब बुद्धपूजा

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या टर्मचा शपथविधी आज ९ जून रोजी सायंकाळी होत असून त्यात ना.रामदास आठवले यांच्या नावाचा समावेश निश्रि्चत झाल्यानंतर आज नाविदिल्लीतील त्यांच्या ११सफदर जंग रोड निवासस्थानी त्यांच्या चाहत्यांनी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.यावेळी बौध्द भिक्खू ही उपस्थित होते.शपथविधी ला रवाना होण्या पूर्वी ना.रामदास आठवले यांनी सहकुटुंब नवी दिल्लीतील निवासस्थानी भिक्खू संघाच्या उपस्थितीत सामूहिक बुद्धपुजा केली. बंगल्याच्या



प्रांगणात तथागत भगवान बुद्धांची मूर्ती आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्प वाहून ना.रामदास आठवलेंनी अभिवादन केले. तसेच निवासस्थानी ना.रामदास आठवले यांनी त्यांच्या मातोश्री दिवंगत हौसा आई आठवले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी ना.रामदास आठवले यांच्या समवेत सौ सीमाताई आठवले आणि जित आठवले पूज्य भदंत डॉ राहुल बोधी महाथेरो; घनश्याम चिरणकर आदींनी बद्धपुजा केली. रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर , सुरेश बार्शिंग, रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे ;युवक आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे, संजय डोळसे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# एस.एफ.टी.सी स्पोर्ट्स क्लब निफाड़च्या खेळाडूंची दैदीप्यमान कामगिरी




**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नाशिक जिल्हा तलवारबाजी असोसिएशन व महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने १६ वी मिनी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा नासिक येथील शुभ मंगल कार्यालय बळी मंदिर येथे उत्साहात संपन्न झाले यामध्ये सरस्वती विद्यालय निफाड चा खेळाडू प्रत्युष सचिन निराळी व स्वराज राजू दारकुंडे यांनी टीम (फाईल) आणी (सेबर) या गटात १ सुवर्णपदक १ कांश पदक मिळविल्याबद्दल दोघांचे सर्वत्र कौतुक होत आहे सहभागी. खेळाडू रितेशा कुमार सहारे, दिव्यांशी ज्ञानेश्र्वर पाटील यांनी सहभाग नोंदवीला या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी क्रीडा संघटक व छत्रपती क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त अशोक जी दुधारे, महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशन सचिव व भारतीय तलवारबाजी असोसिएशन सहसचिव डॉ. उदय डोंगरे, छत्रपती पुरस्कार प्राप्त आनंद खरे,नासिक जिल्हा तलवारबाजी असोसिएशन सचिव राजू शिंदे, इत्यादी उपस्थित होते छत्रपती पुरस्कार विजेते अशोक जी दुधारे यांनी खेळाडूंना तलवारबाजी या खेळाबद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले यामध्ये नाशिकचा खेळाडू प्रत्युष निराळी याने सुवर्ण तर स्वराज दारकुंडे याने कांश पदक मिळविले या सर्व खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक प्रदीप राठोड यांचे मार्गदर्शन लाभले असून नाशिक संघाला पदके मिळवून दिल्याबद्दल त्याचे निफाड़ चे माजी नगराध्यक्षा शारदाताई कापसे,नगरसेविका सविता तातेड,कविताताई धारराव,विक्रम दादा रंधवे,शिवाजी दादा ढेपले, यांनी कौतुक केले. छत्रपती शिवाजी हायस्कूल वनसगावचे प्राचार्य सी.डी.रोटे,धनंजय जी डुंबरे,मनीष कुमार शिंदे, योगेश जी डुंबरे,संदीप भोसले,ज्ञानेश्र्वर पाटील,राजू दारकुंडे,सचिन निराळी,विनोद परदेशी,संदीप डुकरे, यांनी शुभेच्छा दिल्या.

# ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने बौध्दाचार्य, केंद्रीय शिक्षक ,शिक्षिका, धम्ममेळावा




**उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे**

शहाड , पाटीदार भवन येथे रविवार दि ९ जुन २०२४ रोजी भारतीय बौध्द महासभा ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने बौध्दाचार्य केंद्रीय शिक्षक शिक्षिका धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते तसेच या कार्यक्रमाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष विजय गायकवाड गुरुजी होते तसेच या बौध्दाचार्य, केंद्रीय शिक्षक शिक्षिका धम्म मेळाव्याचे उद्घाटन भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड गुरुजी यांच्या हस्ते झाले तसेच या धम्म मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष अड एस के भंडारे सर, राष्ट्रीय उपाध्यक्षा सुषमाताई पवार, महाराष्ट्र राज्य चे सरचिटणीस सुशिल वाघमारे, यांनी मार्गदर्शन केले असून या मेळाव्याला केंद्रीय प्रशिक्षण विभाग सचिव अनिल मनोहर, यांनी दिली भेट , सदरील या बौध्दाचार्य, केंद्रीय शिक्षक शिक्षिका धम्म मेळाव्यात ठाणे जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सुर्यवंशी सर, कोषाध्यक्ष उत्तम सोनवणे, ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा शिलाताई तायडे, सरचिटणीस निर्मलाताई कांबळे, कोषाध्यक्ष जयश्रीताई सरवदे, समता सैनिक दलाचे भास्कर आरखडे सर, हिरामण पगारे, यांच्यासह ठाणे जिल्हा अंतर्गत तालुका अंतर्गत विभागीय शाखेचे बौध्दाचार्य, केंद्रीय शिक्षक, शिक्षिका, यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

# वागदरी येथे बसव प्रतिभा पुरस्कार वितरण समारंभ

**वागदरी/प्रतिनिधी**

जागतिक लिंगायत महासभा सोलापूर शाखा वागदरी आयोजित दहावी मधे ९० टक्के व बारावी मध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रथमच 'बसव प्रतिभा पुरस्कार' देऊन गौरवण्याचे समारंभ आयोजित केल्याचे माहिती शाखेचे सचिव शांतेश्र्वर कोठे यांनी सांगितले.सोमवारी दिनांक १० जून संध्याकाळी ठीक सहा वाजता बसवेश्र्वर मंदिराच्य परिसरामध्ये पाऊस आलेतर शिवलींगेशवर मठाच्या सभागृह मधे हा प्रतिभा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. अचलेर विरक्तमठा चे बसव राजेंद्र महास्वामीजी, अक्कलकोट विरक्त मठाचे बसवलिंग महास्वामीजी व वागदरी विरक्त मठाचे श्री




शिवलिंगेश्र्वर महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात व वागदरीचे सरपंच माननीय श्रीकांत भैरामडगी यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. अक्कलकोट चे माननीय गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे साहेब यांचे शुभहस्ते उद्घाटन कार्यक्रम होईल. शेळके प्रशाला चे माजी चेअरमन मा. मल्लिनाथ शेळके, मुख्याध्यापक अनिल देशमुख सर , जागतिक लिंगायत महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगाव, परमेश्र्वर आराधना पंच कमिटीचे अध्यक्ष राजकुमार निंबाळे वीरेंद्र हिंगमिरे सोशल फाउंडेशन चे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, साई कन्स्ट्रक्शन वागदरी चे मालक शरणप्पा धरणे सहित अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी आपले सहकुटुंब सहपरिवार सहित व नागरिकांनी उपस्थित राहावे म्हणून जागतिक लिंगायत महासभा वागदरी शाखेचे अध्यक्ष शरणप्पा मांगाणे व उपाध्यक्ष घाळव्या स्वामी यांनी विनंती केली आहे.

# बासलेगांव भागातील शेतकरी पेरणीस सुरुवात



**अक्कलकोट/प्रतिनिधी**

राज्याच्या सर्वच भागात हळूहळू मान्सून सक्रिय होत आहे. कोकणानंतर मान्सून आता मुंबईसह सोलापूर जिल्ह्यात दाखल झाला आहे. दि.१५ जूनपर्यंत राज्याच्या सर्व भागात मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तवली जातेय. दरम्यान, सध्या अक्कलकोट तालुक्याच्या विविध भागात पाऊस कोसळत असल्याने बासलेगांव भागातील शेतकरी पेरणीस सुरुवात केलेली आहे.तालुक्यातील बासालेगांव परिसरात गेल्या दोन दिवसापासून पाऊस झाल्याने खरिपाच्या पेरणीला सुरुवात, शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू झाली आहे. या गावातील शेतकरी सत्तारभाई शेख यांनी खरिपाच्या पेरणीला टॅक्टरच्या माध्यमातून सुरुवात केलेली आहे. यांच्यासह परिसरातील महिबुब शेख, बसवराज देकाणे, नागनाथ बिराजदार, गंगाधर बासलेगावकर, रामण्णा भंडारे, संतोष संगपाळ यांनी देखील पेरणीची लगबग सुरू केली आहे.

### यंदा जोरदार पावसाची आशा..! :

अक्कलकोट हा आवर्षण दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यात कोणतेही सिंचन योजना अद्यापही पूर्ण झालेले नांही. यामुळे शेतकरी आपल्या शेतात तालुक्यातल्या पाणी योजना ह्या मृगजळ ठरत असल्याने शेतकऱ्यांनी ज्या त्या भागातून आपली शेती ही चक्क सौर उर्जा प्रकल्पाला भाड्याने देऊन त्याच ठिकाणी मोलमजुरी करीत आहे. ही दुर्दैवी बाब आहे. बासालेगांव भागात देखील सौर उर्जा प्रकल्प येणार असल्याचे सांगितले जात आहे. आमच्याकडे असलेल्या बोटांवर मोजण्या इतकी शेती असून सध्या झालेल्या पाऊसावर व आगामी काळात जोरदार पाऊसाची आशा बाळगून खरीपाची पेरणी केली आहे.

**–सत्तारभाई शेख, शेतकरी बासालेगांव**

### दुबार पेरणीची अडचण टाळण्यासाठी :

पावसाअभावी शेतीची काम खोळंबली होती. त्या कामांना आता वेग आला आहे. दरम्यान, १०० मिलीमीटर पाऊस पडेपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये, दुबार पेरणीची अडचण टाळण्यासाठीचा सल्ला तालुका कृषी भांडार संघटनेचे तालुकाध्यक्ष कृषिरत्न अप्पासाहेब तथा अप्पुकाका पाटील यांनी दिला आहे.

# रशियातील सेंट पिटर्सबर्ग विधानसभा आणि महाराष्ट्र विधानमंडळादरम्यान सामंजस्य करार

## विविध उपक्रमांना सामंजस्य कराराने चालना मिळेल : उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे



**सेंट पिटर्सबर्ग, रशिया/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र विधानमंडळाचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ ५ ते ९ जून, २०२४ दरम्यान सेंट पिटर्सबर्ग (रशिया) च्या अभ्यास दौऱ्यावर असून आज दिनांक ६ जून रोजी दोन्ही विधानमंडळांमधील सामंजस्य करारावर (चेण) स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. हा सामंजस्य करार भारत-रशिया मैत्रीसंबंधांच्या दृष्टीने तसेच मुंबई-सेंट पिटर्सबर्ग सिस्टर सिटीजच्या वाटचालीतील मानाचा तुरा ठरणार असल्याची भावना यावेळी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष आणि अभ्यासदौरा शिष्टमंडळाचे नेते ड. राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केली. तर या करारामुळे विविध उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्र्वास उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

या सामंजस्य करारावर विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि सेंट पिटर्सबर्ग विधानसभेचे अध्यक्ष अलेक्झँडर बेलस्की यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या ऐतिहासिक प्रसंगी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा सदस्य अमिन पटेल आणि श्रीमती गिता जैन, विधानमंडळाचे सचिव-१ (कार्यभार) जितेंद्र भोळे, जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह मुंबईतील रशिया हाऊसच्या संचालक श्रीमती एलिना रेमेझोव्हा, सेंट पिटर्सबर्ग विधानसभेचे सन्माननीय सदस्य, अधिकारी उपस्थित होते.

भारतातील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत महाराष्ट्र विधानमंडळाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. लोककल्याणाचे उद्दिष्ट्य पूर्ण करणारे कायदे, सखोल विचारमंथन आणि वाद-प्रतिवाद-सुसंवाद ही संसदीय लोकशाहीला अभिप्रेत असलेली सभागृहातील चर्चेची परंपरा याकडे उपस्थितांचे लक्ष वेधत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दोन्ही विधानमंडळांमध्ये वैचारिक आदान-प्रदान, दोन्हीकडील सदस्यांच्या अभ्यासभेटी, संगीत-कला-साहित्य क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्यक्रमांचे आयोजन या सामंजस्य करारामुळे आता अधिक चांगल्याप्रकारे करता येऊ शकेल, असा विश्र्वास व्यक्त केला.

विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याप्रसंगी बोलताना रशियाने एक सच्चा मित्र या नात्याने आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये भारताच्या भूमिकेला नेहमीच बळ दिल्याचे सांगितले.

सुमारे ५५५ वर्षांपूर्वी भारत भेटीवर आलेले रशियन व्यापारी अफानासी निकीतीन यांचे अलिबाग जवळील रेवदंडा येथे उभारण्यात आलेले स्मारक तसेच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा मॉस्कोतील रुदोमिनो राष्ट्रीय ग्रंथालयात समारंभपूर्वक बसविण्यात आलेला पुतळा आणि आता आजचा हा सामंजस्य करार स्वाक्षरी समारंभ यामुळे हे मैत्रीसंबंध वेगळ्या उंचीवर पोहचले असल्याचे त्या म्हणाल्या. मराठीतील उत्तम साहित्य रशियन भाषेत अनुवादित करणाऱ्या मराठी भाषा प्रेमी आणि तज्ज्ञ डॉ. नीना क्रस्नादेम्बस्काया यांचा डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी आवर्जून गौरव केला. महिला सशक्तीकरण, अत्याधुनिक आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि विद्यार्थी विनिमय कार्यक्रम (Student Exchange Programme) या बाबींना सामंजस्य करारामुळे निर्माण झालेल्या संयुक्त मंचाद्वारे प्राधान्य दिले जावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सेंट पिटर्सबर्ग विधानसभेचे अध्यक्ष अलेक्झँडर बेलस्की यांनी सप्टेंबर, २०२३ मध्ये आपल्या मुंबई भेटीतील आठवणींना उजाळा दिला आणि सामंजस्य करारातील मुद्यानुसार यापुढील काळात परस्पर सर्वक्षेत्रीय संबंध आणखी दृढ होतील, अशी ग्वाही दिली.

सेंट पिटर्सबर्ग इंटरनॅशनल इकोनॉमिक फोरमला उपस्थिती

रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन यांच्या प्रमुख उपस्थितीत ६ आणि ७ जून रोजी सेंट पिटर्सबर्ग इंटरनॅशनल इकोनॉमिक फोरम - २०२४ चे आयोजन करण्यात आले असून या अत्यंत महत्वाच्या परिषदेसाठी देखील या शिष्टमंडळाला निमंत्रित करण्यात आले आहे. विधानसभा ॲड. राहुल नार्वेकर आणि विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे हे फोरमच्या व्यासपीठावर आपले विचार मांडणार आहेत.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस भाविकाकडून ०३ लाख ७७ हजार किंमतीचे सोने वस्तू अर्पण



**पंढरपूर/प्रतिनिधी**

पुणे येथील भाविक सौ. स्नेहलता हेमंत शिंदे यांनी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस ५९ ग्रॅम (गंठण १ व लॉकेट १) सोने वस्तू अर्पण केले आहेत. त्याची किंमत रू.३७७०००/- इतकी आहे.यावेळी मंदिर समितीच्या वतीने सौ.शिंदे यांचा सत्कार मंदिर समितीचे विभाग प्रमुख श्री ज्ञानेश्र्वर कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.

## अक्कलकोटमध्ये पुरातन संस्कार शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी यांच्या प्रेरणेतून 'श्री गुरुदेव सेवा संस्था' संचलित 'समाधान' आश्रमातून अनेक लोकोपकारी उपक्रम राबविले जातात, त्यापैकीच एक अभिनव उपक्रम म्हणजे 'पुरातन संस्कार शिबीर' असून, या शिबिरास श्रीक्षेत्र अक्कलकोट मध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिवपुरी (यज्ञ नगर) येथे दि.१ जून २०२४ पासून सुरु झाले होते. या शिबीराचे वैशिष्ट्य म्हणजे; पुरातन काळापासून अनेक ऋषी मुनींच्या दिव्य योगदानातून विकसित झालेली, 'भारतीय परंपरेनुसार जगण्याची कला' शिबीरार्थींना अवगत करून दिली जाते. वीरशैव लिंगायत संप्रदायातील साधना पद्धती, मूल तत्व-सिद्धांत, योगासने, सात्विक आहार बनवण्याची पद्धत, स्वावलंबी जीवन कसे जगावे इत्यादीचे ज्ञान प्रत्यक्षात कृतीतून अवगत केले जाते.



सदरचे शिबीर 'समाधान मेळा' अक्कलकोट यांच्या वतीने निःशुल्क स्वरूपात राबविण्यात आले. या शिबीरासाठी ५० शिबीरार्थी निवडले गेले. याप्रसंगी श्री घनबसव अमरेश्र्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी बोलताना म्हणाले की, परिशुद्ध आचरणातून अत्यंत प्रतिभावान पिढी घडवण्याचे सामर्थ्य केवळ एका पुरातन संस्कार शिबीरात असून, घरातील किमान एक तरी व्यक्ती अशा शिबीरात सहभागी व्हावे असे आवाहन महास्वामीजीं यांनी केले.

पूज्यश्री जडेय शांतलिंग महास्वामीजींचे कार्य बहुमोल असून सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन अक्कलकोट विरक्त मठाचे मठाधिपती श्री.म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजीनी आशीर्वचनातून केले. डॉ.पुरुषोत्तम राजीमवाले यांनी शिबीरासाठी जागा उपलब्ध करून दिले.

या शिबीरास पूज्य श्री जडेय शांतलिंगेश्र्वर महास्वामीजी यांचे दिव्य सानिध्य लाभले. या शिबीरास बोधक म्हणून लाभलेले प्रा.रामेश्र्वर बिज्जरगी, बसवराज भाईकट्टी, ड. मनोहर दुधगी, नागनाथ कोणदे, मनोज हत्ती, अभियंता कौशिक नाशी व बाळकृष्ण म्हेत्रे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी कार्यकारी अध्यक्ष उद्योजक बसवराज माशाळे, सचिव व माजी नगरसेवक कांतू धनशेट्टी, प्रमोद लोकापूरे, सागर हळगोदे, सुरेश पाटील, बाळकृष्ण म्हेत्रे, ओंकार लोकापूरे, अविनाश मंगरुळे, राजू मलंग, दत्तकुमार साखरे, राजू कलबुर्गी, सुनिल बिराजदार, ओंकार उटगे, प्रा.वीरभद्र मोदी यांच्यासह आदीजन परिश्रम घेतले. शनिवारी या शिबाराचा 'समारोप व प्रमाणपत्र वितरण सोहळा' पुज्य श्रींच्या दिव्य सानिध्यात पार पडला.

शिबीराच्या समारोप कार्यक्रमास अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सुविद्य पत्नी शांभवीताई कल्याणशेट्टी, समर्थनगर ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच सौ. जयश्रीताई पाटील, माजी सरपंच प्रदीप पाटील, मा.नगरसेवक महेश हिंडोळे यांच्यासह अनेक मान्यवर,पालक, शिबीरार्थी व पंचक्रोशीतून दर्शनासाठी आलेले समाधान सद्भक्त मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण म्हेत्रे यानी केले तर दतकुमार साखरे यांनी आभार मानले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली रिपब्लिकन नेते रामदास आठवलेंची सदिच्छा भेट

**मुंबई/नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांची आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या नविदिल्लीतील सफदर जंग रोड येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या महाविजयाचा निर्धार या यावेळी उभय नेत्यांनी केला.यावेळी उमुख्यमंत्री ना श्री देवेंद्र फडणवीस यांचा आठवले कुटुंबीयांनी सहर्ष स्वागत केले.यावेळी ना. रामदास आठवले यांच्या पत्नी सौ सीमाताई आठवले; पुत्र जित आठवले आणि रिपब्लिकन पक्षाचे युवक आघाडी चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पप्पू कागदे आदी मान्यवर उपस्थित होते.



लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी संविधान बदलण्याचा समाजात फूट पाडणारा विषारी प्रचार केला होता.मात्र तो आरोप खोडून काढण्यात ना.रामदास आठवले आणि रिपब्लिकन कार्यकर्त्यांना मोठे यश आले.रिपब्लिकन पक्षाने दिलेल्या खंबीर साथी मुळे भाजप ला देशभरात सर्वाधिक २४० जागा जिंकता आल्या आहेत. देशभरात भाजप प्रणित एन डी ए ला स्पष्ट बहुमत मिळाले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे तिसरी टर्म सुरू करीत असल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ना. रामदास आठवले यांना शुभेछा दिल्या.

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती चा महविजय करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष भाजप सोबत महायुती ला मजबूत साथ देईल असे आश्र्वासन ना. रामदास आठवलेंनी उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांना दिले.यावेळी सोबत रिपाइं चे युवक आघाडी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पप्पू कागदे आणि ना.रामदास आठवले यांचे सुपुत्र कुमार जित आठवले उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी चुकीचे सल्ले घेऊन भरकटण्यापेक्षा आपल्या आवडीचे करिअर निवडा : अँड.शरद फुटाणे

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी चुकीचे सल्ले घेऊन भरकटण्यापेक्षा आपल्या आवडीचे करिअर निवडल्यास निश्र्चित आपले ध्येय गाठता येईल असे अँड. शरद फुटाणे यांनी व्यक्त केले.ते अक्कलकोट येथील राजेराय मठ, बेला फाउंडेशन व युवा गवळी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२४ या सालातील दहावी व बारावी परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान करण्यात आला. या आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून अँड. शरद फुटाणे हे बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर अँड. अनिल मंगरुळे सेवानिवृत्त प्रा.किसन झिपरे, खेडगी महाविद्यालयाचे प्राचार्य शिवराया आडवीतोटे, बेला फाउंडेशनचे अध्यक्ष श्रद्धांक झिपरे, अँड. विकास जाधव, विकास दोडके, गवळी समाजाचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांतअप्पा झिपरे आदिजन उपस्थित होते. याप्रसंगी अँड. अनिल मंगरुळे, श्रद्धांक झिपरे, प्राचार्य शिवराया आडवीतोटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी चंद्रकांत भागानगरे, भीमाशंकर भास्कर, दीपक शहापूरकर, राम भास्कर, अनिल गवळी, संतोष पंगुडवाले, नमित झिपरे, भारत पंगुडवाले, संदीप झिपरे, गिरीश पगुडवाले, स्वामीनाथ शहापूरकर, प्रकाश तालपिटे, राजकुमार हूचे, कृष्णात तीरकप्पा, सोनबा पैलवान आदीसह समस्त गवळी समाज बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भीमाशंकर भास्कर यांनी प्रास्ताविक केले तर श्रीकांत झिपरे यांनी आभार मानले.

## विठूरायाच्या चंदनउटीपुजेची सांगता; व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांची माहिती



पंढरपूर/प्रतिनिधीः ग्रीष्मऋतूतील वाढत्या उन्हापासून श्रीविठुरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला दिनांक ९ एप्रिल पासून सुरुवात करण्यात आली होती, या पुजेची सांगता दिनांक ०९ जून रोजी करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी दिली.

श्रीविठ्ठलाला उन्हाचा त्रास होऊ नये, त्याची तीव्रता कमी व्हावी, थंडावा मिळावा या भावनेतून ही पूजा केली जाते. विठुरायाप्रमाणे रुक्मिणी मातेला देखील यापद्धतीने चंदन उटी लावण्यात येते. श्री विठ्ठलाच्या चंदनउटीपुजेसाठी २१ हजार व रूक्मिणीमातेच्या पुजेसाठी ९ हजार इतके देणगी मुल्य आकारण्यात येते

. श्रींच्या गर्भगृहातील संवर्धनाचे काम सुरू असल्याने दिनांक १५ मार्च ते ०१ जून पर्यंत पदस्पर्शदर्शन बंद करून फक्त पहाटे ५.०० ते सकाळी ११.०० पर्यंत मुखदर्शन भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत होते. त्यामुळे या कालावधीतील पुजा भाविकांना उपलब्ध करून न देता मंदिर समिती मार्फत करण्यात आल्या होत्या.दिनांक ०२ जून रोजी पदस्पर्शदर्शन सुरू झाल्यानंतर भाविकांना चंदनउटी पुजा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामध्ये विठ्ठलाकडे १८ व रूक्मिणीमातेकडे १२ भाविकांना पुजेचा लाभ मिळाला असून, यामधून मंदिर समितीला ४ लाख ८६ हजार इतके उत्पन्न मिळाले आहे. आज मंदिर समितीच्या वतीने श्रींची चंदनउटीपूजा करून या पूजेची सांगता करण्यात आली. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे व ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख जळगांवकर तसेच विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते. याशिवाय, चंदनउटीपुजेच्या सांगतानिमित्त श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये विशेष भोजन व्यवस्था करण्यात आली होती. त्यामध्ये सुमारे २००० ते २२०० भाविकांना लाभ घेतला.

## राज्यपालांच्या हस्ते ११५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस पदक प्रदान

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्यातील ११५ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांना राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते आज पोलीस शौर्य पदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक तसेच गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले.

राजभवन मुंबई येथील दरबार हॉल येथे झालेल्या पदक अलंकरण सोहळ्यामध्ये २०२१ च्या स्वातंत्र्य दिनी तसेच २०२२ च्या प्रजासत्ताक दिनी जाहीर झालेली पोलीस पदके देण्यात आली.तीस (३०) पोलीस अधिकारी व जवानांना पोलीस शौर्य पदक प्रदान करण्यात आले, तर ७ पोलीस अधिकारी व जवानांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आली. अठ्ठयात्तर (७८) पोलीस अधिकारी व अंमलदारांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदके प्रदान करण्यात आली.



पोलीस अलंकरण समारंभाला अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर तसेच पोलीस अधिकारी, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व गौरविण्यात आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.विनय कारगांवकर, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक, वाहतूक मुंबई, आशुतोष डुंबरे, आयुक्त ठाणे शहर, अशोक अहिरे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, नाशिक ग्रामीण, विनोदकुमार तिवारी, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, चंद्रपूर जिल्हा, प्रल्हाद खाडे, सेवानिवृत्त समादेशक, रा. रा. पो. बल - गट क्र. ६, धुळे, चंद्रकांत गुंडगे, सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र नानवीज, दौंड व मिर्झा अन्वर बेग इब्राहिम बेग, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, नांदेड यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले.पदकाने सन्मानित पोलीस अधिकारी व अंमलदारांची यादी जोडली आहे.

## रेल्वे प्रश्नावर दिलीप माने यांची डीआरएमशी चर्चा

सोलापूर/प्रतिनिधी : स्पर्धेच्या व धावत्या युगात वेळ ही महत्त्वाची असून सोलापूरला येणाऱ्या व जाणाऱ्या रेल्वे गाड्या वेळेवर धावत नसल्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी आहे. रेल्वे गाड्या वेळेवर धावण्यासाठी लक्ष देण्यासह वंदे भारत मुंबईहून चारऐवजी पाच वाजता सोडा, स्टेशनवरील सोयी-सुविधा, पार्किंग जागा या विषयांवर चर्चा करून दिल्ली, गुजरात व दक्षिणेत जाणाऱ्या गाड्यांचा सोलापूर कोटा वाढवण्याची मागणी माजी आमदार दिलीप माने यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नीरजकुमार दोहरे यांना समक्ष भेटून केली.यावेळी सोमनाथ गायकवाड, चंद्रकांत कराळे, भारत आकेन, अप्पालाल इनामदार, श्रीकांत मेलगे-पाटील, सुनील जाधव, नितीन भोपळे, इरेश खुने, सतीश मस्के, रवी कांबळे, श्रीकांत उडासे, शिवलिंग पाटील, महेश घाडगे, विकास कदम आदी उपस्थित होते.सोलापूरला येणाऱ्या व जाणाऱ्या रेल्वेगाड्या गेल्या अनेक दिवसांपासून उशिरा धावत असल्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी आहे.

त्यामुळे वेळापत्रकानुसार सर्व रेल्वेगाड्या वेळेनुसार धावण्याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. वंदे भारत ही प्रवाशांसाठी अत्यंत सोयीची गाडी असून मुंबईहून चारऐवजी पाच वाजता सोडल्यास अधिक प्रवासी वाढतील, असेही माने यांनी रेल्वे प्रशासनाला पटवून दिले. सोलापूर येथून सुटणाऱ्या सर्व गाड्या शक्यतो प्लॅटफॉर्म क्रमांक एकवरूनच सोडाव्यात व आणाव्यात, स्टेशनवर शुध्द पाणी व स्वच्छतेकडे लक्ष द्यावे. स्टेशनच्या इंद्रधनूकडील भागातून प्रवेश, पार्किंग, तिकीट खिडकी व पोलीस चौकीची पूर्तता करावी, पार्किंगसाठी मुबलक जागा उपलब्ध करावी, तिलाटी स्टेशन हद्दीत नवीन सिमेंट कारखाने असून तेथील रेल्वेगेट हटवून पूल करण्यात यावा, सोलापूर रेल्वे विभागात पाच तीर्थक्षेत्रे असून अपंग, ज्येष्ठ नागरिक प्रवाशांना इलेक्ट्रिकल वाहन व व्हीलचेअरची व्यवस्था असावी. सर्व प्लॅटफॉर्मवर अधिकृत खानपान व्हेंडर असावेत, आदी मुद्दे माने यांनी चर्चेत मांडले.